# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३७५-२२ दिनांक ०६/१२/२०२२

## भरदिवसा पिस्तुलाचा धाक दाखवुन सोनाराच्या दुकानात जबरी चोरी करणारा आरोपी गजाआड. नालासोपारा पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक २६/११/२०२२ रोजी फिर्यादी सुरेशकुमार हगामीलालजी धाकड, वय ५८ वर्षे हे त्यांचे सोन्याच्या दुकानात असताना दुपारी १३.४५ वा. ते १४.१५ वा. दरम्यान एका अनोळखी इसमाने दुकानात येवून दागिने विकत घेण्याचा बहाणा करुन फिर्यादीवर पिस्टलसारखे हत्यार रोखून फिर्यादीस मारहाण करुन त्यांचे दूकानातील १०,२६,०००/- रुपये किंमतीचे दागिने जबरीने चोरुन नेले असल्याबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्यावरुन नालासोपारा पोलीस ठाणेस गुन्हा रजि. नं. I ५३८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९४, ३२३, ५०६ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्ष्यात घेवून वरिष्ठांनी सदर गुन्हा उघडकीस आणण्याकरीता गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या. सदर सुचनांच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला व मिळालेल्या गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयातील आरोपी कमलेश रामानंद गुप्ता यास दिनांक ३०/११/२०२२ रोजी दिवा जि. ठाणे येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडे नमूद गुन्हयाच्या अनुषंगाने सखोल विचारपूस करता त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास नमूद गुन्हयात अटक करण्यात आली. नमूद आरोपीताकडून गुन्हयातील जबरीने चोरी केलेल्या दागिन्यांपैकी एकुण ५१ ग्रॅम वजनाचे १,९८,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने, गुन्हयात वापरलेली मारुती सुझुकी कंपनीची वॅगनार कार व बनावट पिस्टल सदृश्य हत्यार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३, श्री. चंद्रकांत जाधव, सहा. पो.आयुक्त नालासोपारा विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. विलास सुपे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. पंडीत मस्के, अमोल तळेकर, पो.हवा. किशोर धनु, पो.ना. अमोल तटकरे, पो.शि.कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर, पो.ना.ढोणे ( नेमणुक-पोलीस उप आयुक्त कार्यालय ) यांनी केलेली आहे.

----oooo----